SPECIAL OFFERS
ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW
www.abhibee.com

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : १२० ● पुणे ● गुरुवार, दि. २० मार्च २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

# सुनीता, तुझे सलाम...!

## नऊ महिन्यांच्या मुक्कामात ४,५७६ वेळा पृथ्वीला घातल्या प्रदक्षिणा



सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांनी केला १२ कोटी १० लाख मैलांचा प्रवास

नऊ महिन्यांच्या मुक्कामात ४,५७६ वेळा पृथ्वीला घातल्या प्रदक्षिणा

तब्बल २८६ दिवस अंतराळ स्थानकात मुक्काम केल्यानंतर परतले पृथ्वीवर

जवळपास नऊ महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर सुनीता विल्यम्स व बुच विल्मोर हे अंतराळवीर भारतीय वेळेनुसार बुधवारी पहाटे पृथ्वीवर दाखल झाले. त्यांना घेऊन निघालेले 'स्पेसएक्स' यान आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून निघाल्यानंतर काही तासांनी फ्लोरिडा पॅनहँडलच्या तेलाहासे जलक्षेत्रात सुरक्षित उतरले. त्यानंतर जवळपास तासभराने अंतराळवीरांना यानातून बाहेर काढण्यात आले. त्यावेळी सुनीता विल्यम्स व त्यांच्या सहकाऱ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहात होता. ही मोहीम यशस्वी झाल्याबद्दल जगभरातून सुनीता विल्यम्स व बुच विल्मोर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

अंतराळवीरांच्या कधीही हार न मानण्याच्या भावनेने सर्वांना प्रेरित केले आहे.
- द्रौपदी मुर्मु, राष्ट्रपती

अंतराळवीरांनी दृढ निश्चयाचा खरा अर्थ काय असतो, हे दाखवून दिले आहे.
- नरेंद्र मोदी, पंतप्रधान

अंतराळवीर फ्लोरिडाच्या समुद्रात सुरक्षित उतरले. आम्ही दिलेले वचन पूर्ण केले.
- डोनाल्ड ट्रम्प, राष्ट्राध्यक्ष, अमेरिका

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com



# सुनीता विलियम्सची घरवापसी

प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांनी गायलेले, सुधीर फडके यांनी संगीतबद्ध केलेली गाणी आज आठवली. निमित्त ठरले, भारतीय वंशाच्या अमेरिकी अंतराळयात्री सुनीता विलियम्स अखेर २८६ दिवसांनंतर पृथ्वीवर परतल्या. भारतीय वेळेनुसार बुधवारी पहाटे ३.२७ वाजता अमेरिकेतील फ्लोरिडाच्या समुद्रात स्पेसक्राफ्ट उतरले आणि त्यानंतर आता जगभरात सुनीता विलियम्स सुखरूप परतल्याची चर्चा सुरू झाली आहे. अंतराळात या नऊ महिन्यांच्या प्रवासात सुनीता विलियम्स या काय करत होत्या. कशा राहिल्या असतील, याबद्दल प्रत्येक भारतीयांच्या मनात एक उत्कंठा आहेच. पण, चंद्रावर पाय ठेवणाऱ्या अंतराळवीरानंतर, संशोधन करण्यासाठी गेलेल्या सुनीता विलियम्स यांची टीम काय करत आहे, याची चर्चा पृथ्वीभोवती फिरणाऱ्या चंद्रासह अन्य ग्रहांनाही असणार, अशी कल्पना केली तर त्यात वावगे ठरणार नाही. हिंदू धर्मग्रंथात या ग्रहांना देवतेचा मान दिलेला असला तरी, वैज्ञानिकदृष्टीने अंतराळात गेलेली सुनीता सुद्धा श्रद्धाळू होती, हे लपून राहिलेले नाही. तिने आपल्यासोबत गणपतीची मूर्ती नेली होती. रामाचे स्मरण ती नेहमी करते, असे तिच्या कुटुंबीयांचे म्हणणे आहे.

सुनीता विलियम्स यांच्या वडिलांचे नाव दीपक पंड्या. गुजरातमधील मेहसाणा गावाचे ते रहिवासी. पंड्या यांनी अहमदाबाद येथून डॉक्टरकीचे शिक्षण घेतल्यानंतर थेट अमेरिका गाठली. येथेच त्यांनी स्लोवेनियाई वंशाच्या महिलेशी लग्न केले. यानंतर या दाम्पत्यांच्या पोटी सुनीता यांचा जन्म झाला. लहानपणी सुनीता यांना प्राण्यांबाबत ओढा होता. याच कारणामुळे आपण जनावरांचे डॉक्टर व्हावे अशी त्यांची इच्छा होती. पशुवैद्यक अभ्यासक्रमासाठी त्यांनी अर्जही केला होता. पण, त्यांना आवडीचे कॉलेज मिळाले नव्हते. यानंतर सन १९८३ मध्ये त्यांनी थेट अमेरिकेतील नौदलात प्रवेश घेतला. १९८७ मध्ये भौतिक विज्ञानाची पदवी घेतली. ही पदवीच सुनीता विलियम्स यांच्या यशाची पहिली पायरी ठरली. नौदलातील प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्या एक पायलट झाल्या आणि अनेक प्रकारची



विमाने उडवली. याच दरम्यान त्यांना जॉन्सन स्पेस सेंटरमध्ये जाण्याची संधी मिळाली. या प्रसंगाने सुनीता यांच्या करिअरला वेगळीच कलाटणी मिळाली. या ठिकाणी त्यांची भेट अंतराळ यात्री जॉन यंग यांच्याशी झाली. जॉन यंग चंद्रावर जाणारे नववे व्यक्ती होते. सुनीता खूप प्रभावित झाल्या. यानंतरच त्यांनी एक एस्ट्रोनॉट बनण्याचा निर्णय घेतला. जॉन यंग यांच्या भेटीनंतर सुनीता विलियम्स यांनी अंतराळ यात्री होण्यासाठी नासात अर्ज केला होता; परंतु त्यांचा अर्ज नाकारला होता. यानंतर सन १९९५ मध्ये त्यांनी फ्लोरिडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीतून इंजिनीअरींगची मास्टर डिग्री घेतली होती. यानंतर पुन्हा नासात अर्ज केला. यावेळी मात्र नासाने त्यांची निवड केली. पण अंतराळात जाण्यासाठी सुनीता विलियम्स यांना बराच काळ वाट पाहावी लागली होती. आठ वर्षांनंतर म्हणजेच २००६ मध्ये त्यांना पहिल्यांदा अंतराळात जाण्याची संधी मिळाली होती.

आता दुसऱ्या मिशनमधून अंतराळवीर सुनीता विलियम्स आणि बुच विल्मोर तब्बल ९ महिन्यांनंतर सुरक्षित पृथ्वीवर परतले आहेत. ५ जून रोजी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर दोघे पोहोचले होते. मात्र त्यानंतर तांत्रिक अडचणींमुळे त्यांना ९ महिने तिथेच राहावे लागले. या कालावधीत तिने अवकाशातून महाकुंभ सोहळा पाहिला. सुनीता विलियम्स यांनी उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभमेळ्याचा फोटो कुटुंबीयांना पाठवला होता. तसेच या मोहिमेदरम्यान त्यांनी ९०० तासांचे संशोधन आणि १५० हून अधिक प्रयोग केले आहेत. भारतातील तिच्या पूर्वजांच्या गावात सर्वचजण देव पाण्यात ठेवून त्यांच्या येण्याची वाट पाहत होते. ती सुखरूप परत यावी म्हणून तिच्या झुलासन या मूळ गावात यज्ञ आणि पूजा आयोजित केली होती. आज अमेरिकेतच नव्हे तर भारतातही उत्साहाचे वातावरण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुनीता विलियम्स यांना खास पत्र पाठवून त्यांचे कौतुक केले आहे. अमेरिकेच्या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्यासोबत सुनीता विलियम्स यांच्या स्थितीबद्दल चर्चा केली होती. “१.४ अब्ज भारतीय तुमच्या कर्तृत्वाचा अभिमान बाळगतात. तुमच्या जिद्दीने संपूर्ण जगाला प्रेरणा मिळाली आहे,” असे पंतप्रधान मोदी यांनी सुनीताला उद्देशून लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे. तसेच, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बायडेन प्रशासनावर टीका करत हे अंतराळवीर संकटात टाकल्याचा आरोप केला. मात्र, व्हाईट हाऊसने शब्द पाळल्यामुळे या यशस्वी मिशनचे श्रेय ट्रम्प यांना दिले आहे.

आता सुनीताची घरवापसी झाली आहे. तिला तिच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी वेळ द्यायला हवा. दीर्घकाळ अंतराळात राहिल्याने सुनीता विलियम्स आणि बुच विल्मोर यांना अनेक आरोग्यविषयक आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. अवकाशामधील गुरुत्वाकर्षणाचा अभाव, हाडांची घनता कमी होणे, स्नायू कमकुवत होणे, तसेच रेडिएशनमुळे दृष्टीवर परिणाम होऊ शकतो. तसेच जास्त काळ अवकाशात राहिल्याने त्यांच्या शरीरावर अनेक बदल देखील दिसून येऊ शकतात. पृथ्वीवर परतल्यानंतर अंतराळवीरांना उभे राहणे आणि चालणे कठीण होऊ शकते. त्यामुळे, सुनीता आणि त्यांच्या टीमला चांगले आरोग्य लाभो ही प्रार्थना करूया.

# तोरणा किल्ल्यावर स्वच्छता व पुर्नस्थापन मोहीम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आरएमडी सिंहगड तांत्रिक महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागातर्फे तोरणा किल्ल्यावर स्वच्छता व पुर्नस्थापन मोहिमेचे आयोजन करण्यात आले. ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी आणि स्वच्छता अभियानाला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित या मोहिमेत NSS स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या मोहिमेचे संपूर्ण आयोजन प्रा. अश्विनी दुधमल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. उपक्रमाला श्री अविनाश जाधव (गड किल्ले संवर्धन सेल पुणे जिल्हा अध्यक्ष) यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

मोहिमेदरम्यान, सुमारे 50 विद्यार्थी आणि दोन प्राध्यापक समन्वयकांनी सहभाग घेतला. NSS स्वयंसेवकांनी किल्ल्यावर जमा झालेल्या प्लास्टिक, कचरा, आणि अन्य घाण साफ करून परिसर स्वच्छ केला. तसेच, परिसराच्या नैसर्गिक सौंदर्याचे रक्षण करण्यासाठी वृक्षारोपण आणि देखभाल कार्य देखील करण्यात आले.



या उपक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. ज्ञानेश्वर घुगे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले आणि मोहिमेच्या यशस्वी आयोजनासाठी मदत केली. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले आणि इतिहास जतन करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा, असे मार्गदर्शन केले.

आरएमडी सिंहगड तांत्रिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वी. व्ही. दीक्षित यांनी स्वयंसेवकांचे मनोबल वाढवले आणि त्यांच्या योगदानाबद्दल त्यांचे कौतुक केले. त्यांनी स्वच्छ भारत अभियानाशी सुसंगत अशा या सामाजिक कार्याचे विशेष महत्त्व अधोरेखित केले आणि भविष्यातही असे उपक्रम आयोजित करावेत, असे विद्यार्थ्यांना सांगितले.

ही मोहीम केवळ स्वच्छता अभियानापुरती मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करणारी ठरली. किल्ले आणि ऐतिहासिक ठिकाणांचे जतन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असा संदेश या मोहिमेतून देण्यात आला. NSS स्वयंसेवकांच्या प्रयत्नांमुळे तोरणा किल्ल्याच्या परिसराला एक नवीन उत्साह प्राप्त झाला आणि स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण झाली.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. भविष्यातही असेच उपक्रम आयोजित करून ऐतिहासिक आणि नैसर्गिक स्थळांचे संरक्षण करण्याचा निर्धार स्वयंसेवकांनी केला आहे.



# महिला कर्मचाऱ्याचा प्रामाणिकपणा

- **तीन लाखांच्या सोन्याची बॅग केली परत**
- **भूपेंद्र मोरेंच्या शिष्टाईने बॅग मूळ मालकाच्या स्वाधीन**

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

गेले चार दिवसापूर्वी नऱ्हे रस्त्यावरून जाताना नऱ्हेतील श्री. विकास पालीवले यांची एक बॅग टू व्हीलर वरून खाली रस्त्यावरती पडली .त्या बॅगमध्ये जवळपास दोन ते तीन लाखाचे सोने मोबाईल पावर बँक तसेच इतर काही वस्तू असा मुद्देमाल होता. अनाहूत पडलेल्या बॅग ची शोधाशोध त्यांच्याकडून सुरू झाली. तरीही बॅग न सापडल्याने त्यांनीत्याबाबत नऱ्हे पोलीस चौकी येथे तक्रार देखील करण्यात आली .

पोलीस यंत्रणेचा तपास सुरू असताना विकास पालीवाले यांनी स्वतः सर्व दुकानांचे सीसीटीव्ही कॅमेरे पाहून चौकशी केली.

एका दुकानाच्या सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये एक महिला ती बॅग हातात घेऊन जाताना दिसली. या अनुषंगाने मदतीसाठी त्यांनी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांचे संपर्क कार्यालय गाठले. भूपेंद्र मोरे यांना त्यांनी त्या महिलेचा फोटो दाखवला . त्यानंतर आरोग्य खात्यामध्ये काम करणाऱ्या कर्मचारी सौ. संगीता साठे या त्या आहेत हे भूपेंद्र मोरे यांनी पाहिले.

व त्यांना फोन करून बोलवून घेतले. त्यांनी ही लगेचच रस्त्यावरती बेवारस ही बॅग मला सापडली असं प्रामाणिकपणे सांगितले .

विलंब न लावता त्यांनी ती बॅग भूपेंद्र मोरे यांच्या साक्षीने श्री. विकास आलीवले यांना सर्व वस्तू तपासून सौ संगीता साठे यांस कडून ती बॅग परत करण्यात आली .

आरोग्य विभागात महिला कर्मचारी असलेल्या सौ संगीता साठे यांचे सामाजिक कार्यकर्ते श्री. भूपेंद्र मोरे यांनी कौतुक व्यक्त केले. एका देशात चेहऱ्यावरील आनंद हा ही एक तुम्हाला आशीर्वाद असतो त्यासाठी प्रामाणिकपणे आपणही माणुसकी टिकवली पाहिजे. एकमेकांच्या मदतीला जाणे हीच खरी शिकवण आहे. असे श्री. भूपेंद्र मोरे यांनी यावेळी सांगितले. श्री विकास पालीवाले यांनी भूपेंद्र मोरे यांच्यासह संगीता साठे यांचे आभार मानले.

# नऱ्हेतील गंधर्व चौकातील ओढ्यावरील पूल धोकादायक

## किमान नवीन संरक्षक जाळी व कठडे बांधा : भूपेंद्र मोरे

- **अपघाताचाही शक्यता**
- **नवीन पुलाची गरज**

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हेतील वाहतूक कोंडीची वर्दळ असलेल्या गंधर्व चौकाकडून मानाजीनगर कडे रस्त्यावरील ओढ्यावरील पूल संरक्षणाअभावी धोकादायक अवस्थेत असल्याचे आढळून येत आहे. पुलावरील संरक्षक जाळी व कठडे पाणीपुरवठा पाईपलाईन व ड्रेनेज कामा निमित्त काढून टाकण्यात आले.

काम होऊन अनेक दिवस झाले तरीही जैसे तेच स्थिती असल्याने यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या दुचाकीस्वार, चालकांना अपघा होऊन जीविताला धोका उद्भवतो आहे. यामुळे या रस्त्यावरील वर्दळीची वाहतूक लक्षात घेता ह्या संरक्षक जाळी व दोन्ही बाजूंनी सिमेंट कठडे बांधण्यात यावे अशी मागणी होत आहे.

अन्यथा रात्री अपरात्री अपघात होण्याची शक्यता आहे. तुटलेल्या जाळीतून प्रचंड प्रमाणात नागरिक ओढ्यामध्ये कचरा टाकत आहेत.

नऱ्हे भागाचे विद्रूपीकरण कचऱ्यामुळे होत आहे. ओढ्यात टाकलेल्या कचऱ्यामुळे पावसाळ्यामध्ये ओढेही थुंबण्याची शक्यता आहे. महानगरपालिकेच्या संबंधित विभागाने सर्व काम लवकरात लवकर करावे. अशी मागणी या भागातील सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी प्रशासनाला केली आहे.

पुणे महानगरपालिका यावर लागलीच लक्ष देऊन दिलासा देईल अशी आशा या भागातील नागरिकांनीही व्यक्त केली आहे.

परिसरात अस्ताव्यस्त पडलेला राडारोडा ही उचलून घेण्यात यावा अशी ही मागणी होत आहे.





**गेली अनेक वर्ष पासून ह्या गावचा नागरिक आहे. या भागातील वाहतूक कोंडी पाहता ह्या ठिकाणी विस्तारित प्रकारे नवीन पूल बांधणे गरजेचे आहे. त्यासाठीही कार्यवाही करण्यात यावी. मात्र सध्या प्राथमिक स्तरावर खराब झालेल्या जाळ्या कढून नवीन जाळ्या टाकाव्या. व संरक्षक कठडे बांधकाम करण्यात यावे.अन्यथा भविष्यात होणाऱ्या अपघाताची जबाबदारी पुणे महानगरपालिकेला घ्यावी लागेल. प्रचंड रहदारीचा रस्ता आहे. महानगरपालिकेने याचा विचार करावा. - श्री. भूपेंद्र मोरे, सामाजिक कार्यकर्ते**

# ज्येष्ठ नागरिक बचत योजना आता एचडीएफसी बँकेतून देऊ करण्यात येत आहे

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँकेने आज जाहीर केले की, आता एचडीएफसी बँकेत ज्येष्ठ नागरिक बचत योजनेच्या (एससीएसएस) अंतर्गत ठेवी स्वीकारण्यात येतील. एससीएसएस ही भारत सरकारद्वारा ज्येष्ठ नागरिकांसाठी चालविण्यात येणारी बचत योजना आहे. एचडीएफसी बँक भारत सरकारसाठी एखाद्या एजन्सी बँकेसारखे काम करेल आणि ग्राहकांना चांगली सेवा प्रदान करून त्यांच्याकडून या योजनेअंतर्गत ठेवी प्राप्त करेल. या बँकेच्या कोणत्याही शाखेत जाऊन पात्र ग्राहक एससीएसएस साठी अर्ज करू शकतात. या योजनेसाठी पात्र असणाऱ्या ग्राहकांमध्ये 60 वर्षे किंवा त्यापेक्षा वयाने मोठ्या व्यक्ती तसेच 55 वर्षे किंवा त्यापेक्षा वयाने मोठे, नोकरीतून निवृत्त झालेले लोक यांचा समावेश आहे. शिवाय, संरक्षण सेवांमधून निवृत्त झालेले कर्मचारी देखील वय वर्ष 50 झाल्यानंतर या योजनेसाठी अर्ज करू शकतात एससीएसएस*मध्ये केलेली गुंतवणूक आयकर अधिनियमाच्या कलम 80 सी अंतर्गत लाभ मिळवण्यास पात्र आहे. या योजनेत त्रिमासिक व्याज देण्यात येते आणि ठेवीचा लॉक-इन पिरीयड 5 वर्षांचा आहे. ही ठेव पुन्हा पुन्हा तीन-तीन वर्षे वाढवून घेता येते. या व्यतिरिक्त, एससीएसएस अंतर्गत देण्यात येणारा व्याज दर सरकारकडून वेळोवेळी सूचित करण्यात येतो. एचडीएफसी बँकेचे हेड-पेमेंट्स, लायबिलिटी प्रॉडक्ट्स, कन्झ्युमर फायनॅन्स अँड मार्केटिंग श्री. पराग राव म्हणाले, “एक आघाडीची एजन्सी बँक म्हणून, भारताच्या मुख्य राष्ट्रीय लघु बचत योजना कार्यक्रमांच्या छत्राखाली आणखी एक योजना देऊ करताना आम्हाला आनंद होत आहे. एससीएसएस ही योजना देशातील ज्येष्ठ नागरिकांना या योजनेतील आकर्षक व्याज दरासह एक स्थिर उत्पन्न स्रोत मिळवून देतो. आयकर गणनेत तुम्ही 80सी कलमाच्या अंतर्गत पात्र ठरता हा या योजनेचा अतिरिक्त फायदा आहे.”

सार्वजनिक भविष्य निधी आणि सुकन्या समृद्धी खाते योजना यांसारख्या सरकारचे समर्थन लाभलेल्या या बँकेच्या वर्तमान ऑफरिंग्जला एससीएसएस योजना पूरक आहे. आर्थिक वर्ष 24 या वर्षात एचडीएफसी बँकेने देशभरात केलेला कर संग्रह 10 लक्ष कोटी रु. पेक्षा जास्त आहे.

# थोडक्यात



## श्री संताजी सेवा मंडळ, धायरी संस्थेतर्फे महाकुंभ जलपूजन सोहळा

**धायरी (आरंभ पर्व) :** नऱ्हे येथे श्री संताजी सेवा मंडळ, धायरी अनुलोमच्या भाग जनसेविका सौ.नयनताई चव्हाण.ल,दिलीप शिंदे व विकास माने यांच्या प्रयत्नातून अनुलोम संस्थेच्या माध्यमातून प्रयागराज येथून महाकुंभमेळ्यातून आणलेल्या जलकलशाचे तेली समाजातील २०-२५ जोडप्यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष अशोक क्षीरसागर, कार्याध्यक्ष लक्ष्मण हाडके, खजिनदार अनंता हाडके, सुरेंद्र दळवी, श्रीधर शेलार, मिलिंद चव्हाण, विशाल करडिले, सुभाष वाळुंजकर तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी व महिला वर्गाने अधिक परिश्रम घेतले. अतिशय उत्साहात हा कार्यक्रम संपन्न झाला.

## 'जाट'मध्ये रणदीप हुड्डा यांच्या "रणतुंगा" भूमिकेचे अनावरण




**मुंबई (आरंभ पर्व) :** प्रेक्षकांच्या उत्सुकतेने उंची गाठलेल्या बहुप्रतिक्षित ॲक्शन चित्रपट "जाट" बद्दलची अपेक्षा आणखी वाढली आहे, कारण निर्मात्यांनी नुकतेच 20 सेकंदांचे एक विशेष व्हिडिओ रिलीज केले आहे, ज्यामध्ये रणदीप हुड्डा "रणतुंगा" या भूमिकेत दिसत आहेत, जो जाटचा धोकादायक शत्रू आहे. या रोमांचक अनावरणामुळे चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे, कारण हा चित्रपट 10 एप्रिल 2025 रोजी भव्य रिलीजसाठी सज्ज आहे. चित्रपटाच्या टीझरने आधीच प्रेक्षकांना "जाट"च्या जगाची झलक दाखवून थरार अनुभव दिला होता. आता निर्मात्यांनी रणदीप हुड्डा यांच्या भूमिकेचे अनावरण केल्यामुळे त्यांच्या दमदार आणि प्रभावी व्यक्तिरेखेची चाहत्यांना कल्पना आली आहे. रणदीप हुड्डा, ज्यांनी आपल्या वैविध्यपूर्ण भूमिकांनी प्रेक्षकांची मने जिंकली आहेत, आता "जाट"मध्ये "रणतुंगा" या दमदार आणि धोकादायक भूमिकेत प्रेक्षकांना चकित करण्यास सज्ज आहेत. रणतुंगाच्या या विशेष व्हिडिओमुळे चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह पसरला आहे. चित्रपटातील हाय-ऑक्टेन ॲक्शन सीक्वेन्स आणि उत्तर भारतीय सिनेमातील रॉ पॉवर यांचा दक्षिण भारतीय सिनेमाच्या रंगतदार आणि ऊर्जावान 'मसाला' घटकांसोबत संयोग झाल्यामुळे प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

## झापुक झुपूकच्या प्रमोशनला जोरदार सुरुवात!

**पुणे (आरंभ पर्व) :** बिग बॉस मराठी’च्या पाचव्या पर्वाचा विजेता सूरज चव्हाण आता मराठी सिनेसृष्टी गाजवण्यासाठी सज्ज झाला आहे. सूरज चव्हाण लवकरच मोठ्या पडद्यावरुन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. गेल्या काही महिन्यांपासून त्याच्या ज्या आगामी चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत त्या चित्रपटाच्या प्रमोशन ला आज मुहूर्त लागलाय. मोरगावच्या गणपती बाप्पाचा आणि जेजुरीच्या खंडोबा देवाचा आशीर्वाद घेत सुरज चव्हाण ने झापून झुपक सिनेमाच्या प्रमोशन ची सुरुवात केली आहे. खंडोबा देवाच्या चरणी आज सूरज ने आपल्या आगामी चित्रपटाचे पोस्टर ठेवून, बाप्पाचा आशीर्वाद घेतला आहे.



## थोडक्यात



### क्रॉस जीन्सने पुण्यात उघडले तिसरे स्टोअर, भव्य सुरुवात

पुणे (आरंभ पर्व) : भारतातील अग्रगण्य महिला डेनिम ब्रँड क्रॉस जीन्स ने आपल्या विस्ताराची गती वाढवत पुण्यात तिसरे एक्सक्लुझिव्ह स्टोअर सुरू केले. एल्प्रो सिटी स्क्वेअर मॉल मध्ये ७२० चौरस फूट जागेत उभारलेल्या या नव्या स्टोअरच्या उद्घाटनानिमित्त ब्रँडने आपले स्प्रिंग-समर'२५ कलेक्शन – 'Summer State of Mind' देखील सादर केले. नव्या युगातील महिलांसाठी खास डिझाइन केलेल्या या कलेक्शनमध्ये आधुनिक फॅशन आणि कम्फर्ट यांचा सुरेख संगम दिसून आला. या कलेक्शनमध्ये पॉप-ह्युड ग्राफिक टी-शर्ट्स, ट्रेंडी बेबी टीज, स्टायलिश कार्गो पँट्स, फ्लेअर्ड जीन्स, क्लासिक स्किनी फिट्स, आरामदायी वाईड लेग डेनिम्स आणि ब्रिझी शर्ट्स यांचा समावेश असून, उन्हाळ्यासाठी आणि कॉलेज-गोईंग लुकसाठी हा परिधान संग्रह परिपूर्ण असल्याचे ग्राहकांनी मान्य केले. गेल्या दोन दशकांपासून क्रॉस जीन्स- मेड इन इंडिया तत्त्वावर कार्यरत असून, डिझाईनपासून उत्पादन आणि फिनिशिंगपर्यंत संपूर्ण प्रक्रिया स्वतःच्या उत्पादन केंद्रातच पूर्ण करण्याची परंपरा जोपासली आहे. त्यामुळे उच्च दर्जा, नाविन्यपूर्ण डिझाईन्स, जलद उत्पादन आणि भारतीय शरीरयष्टीला साजेशा परफेक्ट फिट्स याची खात्री मिळते.




### वयाचं बंधन कशालाच नसतं; ना मैत्रीला, ना प्रेमाला, ना विनोदाला!

पुणे (आरंभ पर्व) : मैत्री, प्रेम, कुटुंब या विषयांवर आजवर बरेच चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत; मात्र राजकमल एंटरटेनमेंट प्रस्तुत, लोकेश गुप्ते लिखित आणि दिग्दर्शित 'अशी ही जमवा जमवी' या चित्रपटात फक्त तरुणांचीच नाही तर वृद्ध मित्र मैत्रिणींचीसुद्धा एक धमाकेदार कहाणी आपल्याला अनुभवयाला मिळणार आहे. या दमदार आणि बहुप्रतीक्षित चित्रपटाचं टिझर प्रदर्शित झालंय, ज्यात अशोक सराफ आणि वंदना गुप्ते या दोन दिग्गजांची मजेदार जुगलबंदी पहायला मिळते. चित्रपटाचं नाव आणि रिलीझ झालेल्या टिझरवरून संपूर्ण सिनेमा पाहण्याची प्रेक्षकांची उत्सुकता आता वाढली आहे. थोडी खट्याळ, थोडी गोंडस, थोडी हळवी अशी चित्रपटाची कथा असून आजच्या तरुणाईसोबत प्रौढांनाही भावणारा, मनोरंजक आणि नवीन विचार मांडणारा हा सिनेमा आहे. अशोक सराफ आणि वंदना गुप्ते या अनुभवी कलाकारांसोबत सिनेमात सुनील बर्वे, चैत्राली गुप्ते, मिलिंद फाटक, सुलेखा तळवलकर, पुष्कराज चिरपुटकर, ओमकार कुलकर्णी, तनिष्का विशे अशा लोकप्रिय कलाकारांची फौज आहे. भारतीय सिनेसृष्टीत मोलाचे योगदान देणारे चित्रपती व्ही. शंताराम यांचे नातू आणि किरण व्ही. शांताराम यांचे चिरंजीव राहुल शांताराम यांनी मनोरंजनविश्वात सिनेप्रेमींसाठी काहीतरी नवीन घेऊन येण्याचे उद्दिष्ट ठेवत 'राजकमल एंटरटेनमेंट' ही नवीन कंपनी सुरू केलेली आहे. प्रेमाची ही नवी कहाणी कशी जमणार आहे, हे जाणून घेणं औत्सुक्याचं ठरणार आहे. 'राजकमल एंटरटेनमेंट'चा हा नवाकोरा चित्रपट १० एप्रिल २०२५ रोजी आपल्या जवळच्या सिनेमागृहात भेटीला येणार आहे.

# मनाचे आरोग्य चांगले राहण्यासाठी सकारात्मक विचार करा

## डॉ. दत्ता कोहिनकर यांचे मत; 'सूर्यदत्त'मध्ये प्रख्यात अभिनेत्री अदा शर्मा व अभिनेता ईश्वाक सिंग यांच्यांशी विद्यार्थ्यांशी संवाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"अभिनयातून प्रेरणा देण्याचे काम होते. चित्रपटाची कथा प्रेरणात्मक असेल तरच मी ती स्वीकारते. 'सूर्यदत्त'च्या विद्यार्थ्यांनी चांगले चित्रपट पाहून प्रेरणा घ्यावी. आपल्या ध्येयपूर्तीसाठी त्याचा उपयोग करावा. प्रत्येकाने स्वयंप्रेरणेतून नात्यातील अथवा करियरमधील निर्णय घ्यावा," असे मत प्रख्यात अभिनेत्री अदा शर्मा यांनी व्यक्त केले.

'तुमको मेरी कसम' या चित्रपटाच्या निमित्ताने सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या बावधन कॅम्पसमध्ये आयोजित विद्यार्थी संवाद कार्यक्रमावेळी अदा शर्मा बोलत होत्या. 'मला मराठी येते आणि मी मराठीतून संवाद साधायचा प्रयत्न करते' या त्यांच्या वाक्यावर सभागृहाने उत्स्फूर्तपणे टाळ्या वाजवून दाद दिली. 'स्त्रीशक्ती' उपक्रमाबद्दल त्यांनी 'सूर्यदत्त'चे अभिनंदन केले.



कार्यक्रमावेळी 'सूर्यदत्त'चे संस्थापक व अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, प्रेरक वक्ते डॉ. दत्ता कोहिनकर, प्रशांत पितालिया, एस. रामचंद्रन, किरण राव, मनीषा कुंभार यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी रेशु अगरवाल (शिक्षण), ॲड. रूपल चोरडिया (पत्रकारिता), शोभा कुलकर्णी (सूत्रसंचालन व अध्यात्मिक सेवा) यांना 'सूर्यदत्त स्त्रीशक्ती पुरस्कार' प्रदान करण्यात आला. डॉ. दत्ता कोहिनकर यांची 'मनशक्ती व तणावमुक्ती' विषयावर कार्यशाळा झाली. या कार्यशाळेत १००० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

अभिनेता ईश्वाक सिंग म्हणाले, "कष्ट, आवड आणि प्रयत्न या त्रिसूत्रीच्या आधारे आपापल्या क्षेत्रात यश शक्य आहे. ग्लॅमरस क्षेत्रात येण्यासाठी उत्सुक असणाऱ्या सर्वांनी आपली आवड जाणून घेणे गरजेचे आहे. स्वतःशीच स्वतःची ओळख गरजेची आहे. एक उत्कृष्ट चित्रपट आपल्या भेटीसाठी येत आहे. आपण जरूर तो पाहावा.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "संपूर्ण महिनाभर सुरु असणाऱ्या 'स्त्रीशक्ती' महिना कार्यक्रमांतर्गत विद्यार्थी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'तुमको मेरी कसम' चित्रपटाचे कथानक संवदेनशील असून महिलांसाठी महत्वाचे आहे. चित्रपट, चित्रपट कलाकार आणि त्यांचे जीवन यातून विद्यार्थ्यांना सातत्याने नवे काही शिकता यावे, याकरिता असा हा उपक्रम आहे. प्रत्येकाने योग्य परिपक्वता आणि ज्ञान प्राप्त केल्यानंतर आपल्या आवडीचे अनुसरण करत करिअरबद्दल निर्णय घ्यावा आणि कठोर परिश्रम करावे."

डॉ. दत्ता कोहिनकर म्हणाले, "बाह्यमन अंतर्मनाला ज्याप्रकारे सूचना देतात, त्याप्रकारे संप्रेरकांची निर्मिती आपल्या शरीरामध्ये करण्याचे काम अंतर्मन करते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नेहमी सकारात्मक विचार करावा व स्वतःवर प्रेम करावे. जसा तुम्ही विचार कराल, तसे तुम्ही घडत असता. ९० टक्के आजार मानवी मनाशी संबंधित असतात. त्यामुळे मनावर नियंत्रण हवे. सकारात्मक राहण्यावर भर द्यावा."

## डॉ. रवींद्र भोळे यांना पुरस्कार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रीय पातळीवर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एकता फाउंडेशन ह्या संस्थेच्या वतीने येथे एका खास कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय गौरव पुरस्कार 2025 प्रदान करण्यातआला. उरुळी कांचन येथील ज्येष्ठ समाजसेवक



प्रवचनकार अपंग सेवक ह .भ. प. डॉ.रवींद्र भोळे यांना नुकताच पुरस्कार प्राप्त झाला आहे. एकता फाउंडेशन सामाजिक संघटन भारत सरकार द्वारा मान्यताप्राप्त नीती आयोग, एम .एस .एम .इ भारत सरकार, आय एस ओ, सीएसआर सर्टिफाईड राष्ट्रीय पातळीवर कार्य करणारी संस्था आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते ह भ प डॉरवींद्र भोळे यांनी राज्यभर विविध क्षेत्रात समर्पित भावनेने निरंतर ,निष्काम ,कर्मयोगी कार्य केलेले आहेत. डॉ.रवींद्र भोळे हे सामाजिक न्यायाचे ऊर्जा स्तोत्र व शांती सेनेचे पुरस्कर्ते आहेत. तसेच जनतेच्या भल्यासाठी निरंतर झटणारे कर्मयोगी कार्यकर्ते आहेत. सामाजिक, वैद्यकीय, शैक्षणिक, अपंग सेवा पर्यावरण, नैसर्गिक आपत्ती, व्यसनमुक्ती ,संस्थात्मक कार्य, राष्ट्रीय सेवा योजना मार्गदर्शन, नेहरू युवा केंद्राच्या वतीने विविध उपक्रम तसेच कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणे, राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे, राष्ट्रभक्तीची ज्योत पेटविणे, अध्यात्माचा प्रसार व प्रसार करणे, सांस्कृतिक धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करणे, इत्यादी क्षेत्रांमध्ये ज्येष्ठ समाजसेवक ,प्रवचनकार हिंदू रत्न डॉ. रवींद्र भोळे यांनी चाळीस वर्षापासून राज्यभर महाराष्ट्रात सेवाव्रती कार्य केलेले आहे.

## देवगड हापूस आंब्यांवर आता युनिक आयडी कोड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देवगड अल्फोन्सो (हापूस) आंब्याच्या नावाने बाजारात होणारी तोतयागिरी आणि बनावट आंब्यांची विक्री रोखण्यासाठी 'हापूस (अल्फोन्सो)'च्या भौगोलिक संकेत (जीआय) टॅगची रजिस्टर्ड प्रोप्रायटर असलेल्या देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने या वर्षीपासून प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर 'टॅंपर प्रूफ युआयडी सील' (TP Seal UID) सक्तीचे करण्याचा निर्णय घेतला आहे.



त्यामुळे आता प्रत्येक अस्सल देवगड हापूस आंब्यावर हा खास 'टॅंपर प्रूफ युआयडी सील' स्टिकर लावणे बंधनकारक असेल आणि असे युआयडी असलेले आंबेच 'देवगड हापूस' किंवा 'देवगड अल्फोन्सो' म्हणून विक्री किंवा विपणन करता येणार आहे.

या उपक्रमामुळे देवगड हापूसच्या नावाखाली सर्रास होणारी बनावट आंब्यांची विक्री पूर्णतः बंद होतील आणि ग्राहकांना केवळ जीआय प्रमाणित, अस्सल देवगड हापूस आंबेच मिळतील असा संस्थेचा विश्वास आहे. देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्था मर्यादित चे संचालक सदस्य ॲड. ओंकार एम. सप्रे म्हणाले, देवगड तालुक्यातील हापूस आंबा गेल्या शतकाहून अधिक काळ आपल्या विशिष्ट सुगंध व चवीसाठी प्रसिद्ध आहे आणि त्याला बाजारात मोठी मागणी आहे. मात्र, सध्या देवगड हापूसच्या नावाखाली विक्री होणारे ८० टक्क्यांपेक्षा जास्त आंबे हे वास्तविक देवगडमधील नाहीत. गेल्या तीन दशकांपासून इतर भागांतील निकृष्ट दर्जाचे आंबे सर्रास देवगड हापूस म्हणून विकले जात आहेत. त्यामुळे देवगडमधील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे, त्याचे गंभीर सामाजिक दुष्परिणाम देखील होत आहेत. त्यामुळेच 'हापूस (अल्फोन्सो)'च्या जीआय टॅगची रजिस्टर्ड प्रोप्रायटर या नात्याने प्राप्त होणाऱ्या अधिकारांचा वापर करून संस्थेने 'टॅंपर प्रूफ युआयडी सील' सक्तीचे करण्याचा हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे."

या प्रकल्पाकरिता 'टॅंपर प्रूफ युआयडी सील'चे पेटंट असलेल्या संस्थेने मुंबई स्थित सन सोल्यूशन्स संस्थेबरोबर करार केला आहे.

'टॅंपर प्रूफ युआयडी सील' स्टिकर प्रणाली कशी काम करते?

देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने जीआय नोंदणीकृत शेतकऱ्यांना त्यांच्याकडील झाडांची संख्या व त्यांच्या उत्पादन क्षमतेनुसार 'टॅंपर प्रूफ युआयडी सील' वितरित केले आहेत. शेतकऱ्यांनी बाजारात पाठवलेल्या प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर हा युआयडी स्टिकर लावणे बंधनकारक असेल.

## उत्तम कामगिरी आणि मजबूत वचनबद्धता यांच्यासाठी कारगिलचा गौरव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कारगिल या अन्न आणि शेती या विषयातील जागतिक स्तरावरील आघाडीच्या कंपनीचा १५ व्या कॉन्फेडेरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) फूड सेफ्टी ॲवॉर्ड्स २०२४ मध्ये उत्तम कामगिरी आणि शक्तिशाली वचनबद्धतेसाठी गौरव करण्यात आला. हे पुरस्कार नवी दिल्ली येथे आयोजित एका समारंभात प्रदान करण्यात आले असून त्यातून आपल्या सर्व कार्यान्वयनांमध्ये कारगिलची सर्वोच्च अन्नसुरक्षा राखण्याची वचनबद्धता दिसून येते.







कंपनीला 'मोठे उत्पादन करणारे अन्न व्यवसाय - चरबी आणि तेल' श्रेणीत, महाराष्ट्रातील कुरकुंभ येथील कारखान्याला 'अन्न सुरक्षेतील उत्कृष्ट कामगिरी' आणि गुजरातमधील कांडला येथील कारखान्याला 'अन्न सुरक्षेबाबत मजबूत वचनबद्धता' या श्रेणीत हे पुरस्कार मिळाले. हा सन्मान कारगिलच्या कडक अन्न सुरक्षा शिष्टाचार, उत्कृष्ट गुणवत्ता नियंत्रण आणि अत्याधुनिक उत्पादन पद्धतींबद्दलचे समर्पण अधोरेखित करतो. जम्मू आणि काश्मीरमधील अन्न सुरक्षा आणि औषध प्रशासनाचे आयुक्त हशमत अली यट्टू, आयएएस, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव श्री. मिन्हाज आलम, आयएएस, विज्ञान, मानके आणि विनियम सल्लागार डॉ. अलका राव, भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण (एफएसएसएआय) आणि सीआयआय अन्न आणि कृषी केंद्र उत्कृष्टता (फेस) च्या प्रमुख श्रीमती कावेरी गांगुली यांच्या उपस्थितीत प्रदान केला गेला आहे.

या पुरस्काराबाबत बोलताना, कारगिल फूडचे दक्षिण आशियाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सायमन जॉर्ज म्हणाले, "हा गौरव आमच्या टीमच्या अन्न सुरक्षा आणि गुणवत्तेसाठीच्या अढळ वचनबद्धतेचे प्रतीक आहे. आमची उत्पादने केवळ जागतिक अन्न सुरक्षा मानकांची पूर्तता न करता त्याहीपेक्षा जास्त कामगिरी करतील याची खात्री करण्यासाठी आम्ही जागतिक दर्जाच्या प्रक्रिया वापरतो. कुरकुंभ आणि कांडला कारखाने ऑटोमेशन, चाचणी आणि प्रशिक्षणातील आमच्या प्रयत्नांचे एक उत्तम उदाहरण आहेत. ते आमच्या ग्राहकांना सुरक्षित, उच्च-गुणवत्तेचा अन्नपुरवठा करण्यासाठी एकत्रितपणे काम करतात. आम्ही अन्न सुरक्षेमध्ये सातत्यपूर्ण सुधारणा आणि नावीन्यपूर्णतेसाठी समर्पित आहोत."

सीआयआय अन्न सुरक्षा पुरस्कार हे अन्न उद्योगातील विविध क्षेत्रांमध्ये जसे पेये, दुग्धजन्य पदार्थ, बेकरी, खाद्यतेल, तयार स्नॅक्स आणि इतर अनेक पदार्थांच्या अन्न सुरक्षेतील उत्कृष्टतेसाठी एक मानक आहेत. हे पुरस्कार कंपन्यांचे कठोर अन्न सुरक्षा मानकांचे पालन, अन्न सुरक्षा उपायांच्या अंमलबजावणीतील नेतृत्व आणि नियामक आणि वैधानिक मार्गदर्शक तत्त्वांचे पालन यावर आधारित राहून मूल्यांकन करतात. मूल्यांकन प्रक्रियेमध्ये तज्ज्ञांच्या टीमद्वारे प्रत्यक्ष भेटीद्वारे तपासणी केली जाते जेणेकरून अन्न सुरक्षेतील सर्वोत्तम पद्धतींनाच मान्यता मिळेल.

# २१ मार्चपासून प्रेक्षकांच्या भेटीला येणार 'नयन'

## लेखक-दिग्दर्शक अंकुश मोरे यांचा बहुप्रतिक्षीत चित्रपट होणार प्रदर्शित

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मनाला भिडणारे अनोखे विषय नावीन्यपूर्ण पद्धतीने प्रेक्षकांसमोर मांडण्यासाठी मराठी सिनेसृष्टी जागतिक पातळीवर ओळखली जाते. अशाच पद्धतीचा तसेच 'आजचा संघर्ष, उद्याचे सामर्थ्य' अशी प्रेरणादायी टॅगलाईन असलेला 'नयन' येत्या शुक्रवारी म्हणजेच २१ मार्च रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात एक महत्त्वपूर्ण विषय अतियश सहजपणे सादर करण्यात आला आहे. गोपी एन्टरटेन्मेंटच्या बॅनरखाली निर्मात्या अरुणा मोरे यांनी 'नयन' या बहुचर्चित चित्रपटाची निर्मिती केली आहे. 'नयन'ची कथा-संवादलेखन अंकुश मोरे यांनी केले असून, त्यांनीच या चित्रपटाचे कल्पक दिग्दर्शनही केले आहे. या चित्रपटाची कथा कोकणात घडणारी आहे. नृत्याची आवड असलेल्या




नयनची रोमांचक तसेच हृदयस्पर्शी गोष्ट या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. ही गोष्ट जरी एका नयनची असली तरी ती जगभरातील असंख्य तरुणांचे प्रतिनिधीत्व करणारी आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने समाजातील एक जळजळीत वास्तव रुपेरी पडद्यावर सादर करण्याचे धाडस अंकुश मोरे यांनी केले आहे. अंकुश मोरे यांना कलाकारांची अचूक साथ लाभल्याने 'नयन'च्या रूपात एक सर्वांगसुंदर कलाकृती प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाबाबत अंकुश मोरे म्हणाले की, या चित्रपटाची कथा वेगवेगळे पैलू उलगडणारी आहे. समाजातील विविध मुद्द्यांवर भाष्य करत अनेक प्रश्न उपस्थित करणारी असून, त्यावर अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारी आहे. आजवर क्वचितच चर्चिल्या गेलेल्या विषयाला 'नयन' वाचा फोडणार आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने नयनसारख्या असंख्य तरुणांची व्यथा आणि कथा समाजासमोर येणार आहे.

यामुळे कदाचित भविष्यातील नयनरूपी तरुणांचे आयुष्य सुखकर होण्याची शक्यता आहे. आशयघन कथानक, मुद्देसूद पटकथा, अर्थपूर्ण संवाद, आपलीशी वाटणारी बोलीभाषा, सहजसुंदर अभिनय, उत्कंठावर्धक दिग्दर्शन, पटकथेशी एकरूप होणारी गाणी, कर्णमधूर संगीत, सुरेख सादरीकरण आणि दर्जेदार निर्मितीमूल्ये याद्वारे 'नयन'च्या रूपात एक परिपूर्ण कलाकृती प्रेक्षकांसमोर सादर करण्यात आल्याचेही मोरे म्हणाले.

'नयन'ची पटकथा नारायण गोंडाळ यांनी लिहिली असून, संकलन सुबोध सुधाकर नारकर यांनी केले आहे. सिद्धेश पै, मोनालिसा बागल, सुहास पळशीकर, अंशुमाला पाटील, रिना लिमन, गणेश यादव, दीपक शिर्के, विजय पाटकर, प्रणव रावराणे, श्रीनिधी शेट्टी आदी कलाकारांच्या या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. सुरेश वाडकर, जावेद अली, आदर्श शिंदे, स्वप्नील बांदोडकर, आनंदी जोशी, राहुल सक्सेना या मराठीतील आघाडीच्या गायकांनी 'नयन'मधील गाणी गायली आहेत. संगीत विक्रांत वार्डे यांचे आहे, तर पार्श्वसंगीत पंकज पडघम यांनी दिले आहे. नृत्यदिग्दर्शन सिद्धार्थ पै यांचे असून, ध्वनी संयोजन सुनील पाटोळे यांनी केले आहे.

छायालेखन डिओपी राजा फडतरे यांचे असून, महेश भारंबे या चित्रपटाचे कार्यकारी निर्माते आहेत. रंगभूषा दादाभाई सेना समुद्रे, संतोष चारी यांनी, तर वेशभूषा महेश यांनी केली आहे.



# सेप्ट विद्यापीठाचे निवडक अभ्यासक्रमांची घोषणा; नोंदणी सुरू

- नोंदणी १९ - २१ मार्च २०२५ दरम्यान sws.cept.ac.in येथे करता येणार
- ऑनलाइन, विद्यापीठच्या आवारात, किंवा परदेशी जाऊन शिक्षणाचे ५० विविध अभ्यासक्रम
- परदेशी जाऊन शिक्षण घेण्यासाठी पॅरिस, व्हेनिस, मॉस्को, क्वालालंपूर, सिंगापूर असे विविध पर्याय उपलब्ध



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सेप्ट विद्यापीठाने २०२५ च्या उन्हाळी सतरासाठीचे ऐच्छिक अभ्यासक्रम नुकतेच जाहीर केला आहे. बारावी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना तसेच व्यावसायिकांना हा अभ्यासक्रम खुला आहे. त्यांनी निवडलेल्या अभ्यासक्रमाशी त्यांचे शिक्षण किती सुसंगत आहे या आधारावर त्यांची नोंदणी होईल. इच्छुक विद्यार्थंकडून ऑनलाइन पद्धतीने नोंदणी १९ मार्च २०२५, दुपारी १२ पासून सुरु होईल आणि २१ मार्च २०२५ ला सायंकाळी ६ पर्यंत स्वीकारली जाईल.

ऑनलाइन आणि भारतात / परदेशात प्रवास पद्धतीने शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी १९ मे २०२५ पर्यंत आणि सेप्टच्या आवारात शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी २६ मे २०२५ पर्यंत उन्हाळी अभ्यासक्रम सुरू होण्याच्या तारखा नोंदणी करता येईल. नोंदणी आणि अभ्यासक्रम याविषयी माहिती https://sws.cept.ac.in/ येथे उपलब्ध आहे

सेप्ट विद्यापीठाचे उन्हाळी आणि हिवाळी ऐच्छिक अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना वैविध्यपूर्ण, सखोल आणि परंपरागत वर्गाखोलीबाहेर चे अनुभव देऊन ज्ञानात मौल्यवान भर टाकणारे असतात.

सेप्ट विद्यापीठाने युरोप मधील शिक्षणपद्धतीतील उन्हाळी आणि हिवाळी अभ्यासक्रमांची आधुनिक संकल्पना भारतात तुलनेने ब-याच आधी सुरू केली. ही दोन सत्रे - उन्हाळी आणि हिवाळी - दोन ते चार आठवड्यांची असतात आणि या कालावधीत विद्यार्थ्यांना बहुशाखीय शिक्षणाची संधी मिळवून देतात.

विद्यार्थ्यांना सहाध्यायींच्या सहवासात शिकण्याला प्रेरित करणे, विचारांचे आदानप्रदान घडवून आणणे आणि विद्यार्थ्यांना त्यानी निवडलेल्या अभ्यासक्रमांचा शैक्षणिक चौकटीबाहेर जाऊन विचार कण्यास प्रवृत्त करणे हे या उन्हाळी - हिवाळी अभ्यासाक्रमांचे प्रमुख उद्दिष्ट आहे. म्हणूनच सेप्ट सर्व विद्यापीठांच्या आणि सर्व विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमांत दाखल होण्यास उत्तेजन देते. या अभ्यासक्रमाचा अपेक्षित परिणाम साधी व्हावा यासाठी व्यावसायिक, अध्यापक, कलावंत आणि विविध क्षेत्रातील भारतीय आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ विद्यार्थ्यांना शिकवतात.

या वर्षी सेप्ट ने २०२५ च्या उन्हाळी सत्रात वैविध्यपूर्ण अभ्यासक्रम उपलब्ध केले असून त्यांत पॅरिस सारख्या शहरांतला नगर विकास ते भूतान मधील कणखर नागरी टिकाऊपणा इतकी मोठी व्याप्ती आणि विविधता आहे. यातील निवडक वैशिष्ट्यीकृत विषयांमध्ये डिकोडिंग मेकॅनिक्स, प्रकाशयोजनाद्वारे रात्रीच्या वेळी अंधाराचे जतन करणे; किंवा इमॅजिन्ड लँडस्केप्स: अ सिनेमॅटिक मॅपिंग ऑफ पॅरिस यांचा समावेश आहे.

अशा ५० अभ्यासक्रमांमधून विद्यार्थ्यांना निवड करता येईल आणि प्रत्यक्ष विद्यापीठ आवारात, ऑनलाइन आणि भारत / परदेशात प्रवास करत अभ्यासक्रम पूर्ण करता येईल.

देशांतर्गत किवा परदेशी प्रवास करून उन्हाळी / हिवाळी अभ्यासक्रम पूर्ण करण्याला मोठी पसंती असून अशा अभ्यासक्रमांत एखाद्या विषयात गढून जाऊन प्रयोग करत शिकण्याची संधी मिळवत विद्यार्थी विविध संस्कृतींचा तसेच बांधकामांच्या वास्तुशास्त्रीय दृष्टीकोणातून अभ्यास करू शकतात.

यावर्षी विद्यार्थ्यांना जपान ला जाऊन तिथल्या बांधकामांमधून दिसणारा संस्कृती, परंपरा आणि नवनिर्मिती यांचा मिलाफ पाहता येईल. सर्जनशील वृत्तीच्या विद्यार्थ्यांना अंदमान बेटांमधील ओशनिक टेल्स द्वारा पाण्याखालील चित्रीकरण तसेच परिसरातील विविध प्रजातींच्या रक्षणासाठी डिझाइन चा वापर याविषयी ज्ञान मिळविता येईल.

या अभ्यासक्रमांचे फायदे अधोरेखित करताना उप प्राचार्य प्रा. चिरायू भट म्हणाले , सेप्ट चे उन्हाळी आणि हिवाळी ऐच्छिक अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने आखण्यात आले आहेत.

इतर विद्यार्थ्यांच्या सह शिकताना त्यांना विविध दृष्टीकोण मिळतात आणि गुण संचय करून त्यांना अभ्यासक्रम निवडण्यात लवचिकता मिळवता येते.

या अभ्यासक्रमांचे स्वरूप बहुशाखीय असल्यामुळे कल्पक अध्यापन पद्धतीने शिकत विद्यार्थी नवीन क्षेत्रांचा अभ्यास करू शकतात आणि आपले बौद्धिक क्षितिज रुंदावू शकतात.

## थोडक्यात

### आंतरराष्ट्रीय महोत्सवात 'भेरा' २१ मार्चपासून रसिकांच्या भेटीला



पुणे (आरंभ पर्व) : तळकोकणाच्या सौंदर्याने नटलेला आणि स्थानिक कलाकारांच्या वास्तव अभिनयाने सजलेला 'भेरा' हा चित्रपट २१ मार्च २०२५पासून महाराष्ट्राच्या विविध भागांत प्रदर्शित होत आहे. श्री वैजप्रभा चित्र निर्मित हा चित्रपट प्रसाद खानोलकर यांच्या 'साकव' या कथेवर आधारित आहे. तर दिग्दर्शन श्रीकांत प्रभाकर यांनी केले आहे. या चित्रपटाची पटकथा प्रसाद खानोलकर आणि श्रीकांत प्रभाकर यांनी लिहिली आहे. तर समीर भास्कर यांचे छायांकन आहे. या चित्रपटात दीपक जोईल, श्रद्धा खानोलकर, प्रमोद कोयंडे, आकांक्षा खोत, विवेक वाळके, गौरव राऊळ यांच्या मुख्य भूमिका आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात चित्रपटगृहांची संख्या अत्यल्प असल्यामुळे २८फेब्रुवारीपासून या जिल्ह्यातील वेंगुर्ला, मालवण, कुडाळ, देवगड येथील नाट्यगृहांत 'भेरा' चित्रपट दाखविण्यात आला. या खेळांना सिंधुदुर्गातील रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे ज्या गावात या चित्रपटाचे चित्रीकरण झाले, त्या शेळपी गावात 'भेरा' दाखवून शेळपीवासीयांना अनोखी मानवंदना देण्यात आली.



### वाढत्या तापमानावर सीड बॉलचा उपाय : प्रशालेचा उपक्रम

पुणे (आरंभ पर्व) : भारती विद्यापीठाची सौ विजयमाला कदम कन्या प्रशालेत पर्यावरण रक्षण जागरूकता देशी बीजेचे संवर्धन व जागतिक तापमान वाढी वरील उपाय म्हणून ३०००सीड बॉल तयार करणे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते माती राख शेण व इतर सेंद्रिय खतापासून तयार केलेल्या ओल्या मातीच्या बॉलमध्ये देशी बीज टाकून हे सिडबॉल तयार करण्यात आले पावसाळ्यात शालेय परिसरात तसेच छोट्या टेकडीवरती नैसर्गिक पाण्याच्या उपलब्ध स्तोत्रामध्ये हे बॉल टाकून हरित आवरण वाढवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत या उपक्रमासाठी प्रशालेच्या मुख्याध्यापिकासौ वंदना देशमुख यांनी मार्गदर्शन केले त्याचबरोबर सौ शितल विश्वासराव यांनी प्रकल्पाच्या कारवाईसाठी उत्तम असे नियोजन केले इयत्ता सहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी यात उत्साहाने सहभाग घेतला होता सुमारे ३००० च्या वर सिडबॉल तयार करण्यात आले प्रशाली सर्व शिक्षक यावेळी उपस्थित होते सर्व यावेळी पर्यावरण रक्षक वृक्षारोपण संवर्धनासाठी शपथ घेण्यात आली.

### धावत्या टेम्पोच्या खिडकीतून उडी मारल्याने बचावलो...

हिंजवडी (आरंभ पर्व) : टेम्पो ट्रॅव्हलरला चालकाच्या सीटजवळ अचानक आग लागली. चालकाने स्वत:ला वाचविण्यासाठी दरवाजातून बाहेर उडी मारली. चालक नसलेला टेम्पो तसाच पुढे वेगाने निघाला. टेम्पोत आग पसरत गेली, प्रचंड धूर झाला होता. गुदमरत असल्याने सर्वजण घाबरले होते. काहीजणांनी दरवाजातून जसे जमेल तशा उड्या मारल्या. मी टेम्पोत मधल्या सीटवर होतो. विप्रो कंपनीजवळ दुभाजकाला टेम्पो धडकल्याने वेग थोडा कमी झाला. मी खिडकीची काच सरकावून धावत्या टेम्पोतून बाहेर उडी मारली. दैव बलवत्तर होते म्हणून मी बचावलो... या टेम्पोतून प्रवास करीत असलेले विश्वनाथ जोरी यांनी बोलताना 'ऑंखो देखा हाल' सांगितला. जिवावर बेतलेला हा प्रसंग सांगताना त्यांचा कंठ दाटून आला होता. विश्वनाथ जोरी कोथरूडमधील शांतिवन सोसायटीत राहतात. घरची जेमतेम परिस्थिती. मुलगा महाविद्यालयात शिक्षण घेत असून, पत्नी गृहिणी आहे.

## राज्यकर्त्यांच्या चुकांवर लेखणीने प्रहार करणे हे पत्रकारांचे आद्यकर्तव्य - सदानंद दिक्षीत

**किरण खुडे**



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

राज्यकर्त्यांना आरसा दाखविणे, त्यांच्या चुकांवर लेखणीने प्रहार करणे हे पत्रकारांचे आद्यकर्तव्य आहे. असे प्रतिपादन योग व आयुर्वेद तज्ञ सदानंद दिक्षीत यांनी येथे केले. खेड तालुका पत्रकार संघ आयोजीत तिथीनुसार शिवजयंती निमित्त पत्रकार संघ कार्यालयात आयोजित छत्रपती शिवाजी महाराज, आद्य पत्रकार, दर्पनकार, आचार्य बाळशास्त्री जांभेकर आणि हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या प्रतिमांचे अनावरण प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी व्यासपिठावर संघाचे अध्यक्ष संजय शेटे, माहीती अधिकर कार्यकर्ते कुंडलीक कोहीनकर, सामाजीक कार्यकर्ते अमर बोन्हाडे उपस्थित होते.

पुढे बोलताना दिक्षीत म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी पारतंत्र्यात पिचलेल्या मनाला आणि मनगटाला उभारी देऊन स्वराज्य निर्माण केले. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी लेखणीतून समाजमनाचा आरसा सरकारला दाखवला आणि हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांनी आपल्या क्रांतीकार्यातून तसेच बलीदानातून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जीवन समर्पित केले. या तिन्ही विभूतींनी अतिशय कमी वयात जीवनाचे ध्येय म्हणजे राष्ट्रकार्य आहे, हा आदर्श निर्माण केला.

पत्रकारांनी आपल्या पत्रकारीतेतून सुराज्य घडविण्यासाठी प्रयत्न केला पाहीजे. तसेच वेळप्रसंगी पत्रकारीतेची लेखणीची धार चुकीच्या प्रवृत्तींविरुद्धही वापरली पाहीजे. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. पत्रकार संघ कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज, दर्पनकार बाळशास्त्री जांभेकर आणि हुतात्मा राजगुरू यांच्या प्रतिमांचे अनावरण दिक्षीत यांच्या हस्ते करण्यात आले. सामाजीक कार्याबद्दल अमर बोन्हाडे व एसटी महामंडळात विनाअपघात आदर्श सेवा देणारे चालक महादेव तुळसे यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघाचे माजी अध्यक्ष बाळासाहेब सांडभोर यांनी प्रास्ताविक उपाध्यक्ष ॲड. निलेश आंधळे, अतिथी परिचय किरण खुडे यांनी तर अध्यक्ष संजय शेटे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॲड. निलेश आंधळे, संजय शेटे, महेंद्र शिंदे, अशोक कडलक, बाळासाहेब सांडभोर, रोहीदास होले, सदाशिव आमराळे, किरण खुडे, प्रभाकर जाधव, अशोक कोरडे यांनी प्रयत्न केले.

यावेळी ह.भ.प. नामदेव कहाणे, बबन पाटोळे, उत्तम गावडे उपस्थित होते.

## "तुला पाहताना...." कार्यक्रमात रसिक मंत्रमुग्ध

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पौॲड्स क्रिअशनच्या वतीने उदयोन्मुख संगीतकार केदार गणेश अभ्यंकर यांनी संगीतबद्ध केलेल्या निवडक रचनांचा आगळा वेगळा पण बहारदार गीतांचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात भरत नाट्य मंदिर येथे पार पडला.

भक्तिगीत, भावगीत, लावणी आणि गझल यांचा अनोखा संगम असलेली नवी कोरी करकरीत गाणी जेष्ठ तसेच नवोदित गायकांनी उत्कृष्ट सादर केली. सर्व कलाकारांनी नागपूर येथून येऊन प्रथमच पुण्यातील मंचावर आपली गाणी सादर केली. सर्व गीते नागपूर, मुंबईच्या कवी व कवयित्री यांनी लिहिलेली होती.

सदरील कार्यक्रमात गजानन स्तुती, आली रेणुका माऊली, पैंजणाचा नाद आला, अनंत कोटी, कसा साजिरा सुंदर, श्री रघुनंदन, कान्हा माझा कसा ,आई अंबाबाई माता ही भक्ति गीते सादर झाली. शुक्राची चांदणी, चेहरा हसरा तिचा, प्रेमाचा अधिकार ह्या गझल होत्या. मेरा चेहेरा तेरी आँखो में ही हिंदी गझल होती.

तसेच स्वप्नांचा गाव व मी मनात काही म्हंटले अशी द्वंद्व गीते सादर झाली. कल्लोळ, संतुष्ट , अलवार पापणीत, सुस्वभाव, बासरी लाजते, क्षण काही ते ही भावगीते सादर झाली. नाकात नथनी, नका हो लाऊ माया राया. ह्या लावण्या ही सादर झाल्या. अशी विविध प्रकारची गाणी संगीतकार केदार गणेश अभ्यंकर व सहकाऱ्यांनी सादर केली. या कार्यक्रमाला पुणेकरांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देऊन उत्स्फूर्त दाद दिली.

संगीतकार केदार गणेश अभ्यंकर यांच्या जाऊदे मथुरा बाजारी ह्या गवळणीवर विधिज्ञ स्वप्ना ह्यांनी अप्रतीम नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

या सर्व गीतांना संगीतकार केदार अभ्यंकर यांनी चाली देऊन सर्व गायकांकडून बसवून घेतली होती. यामध्ये वादकांनी मोलाची साथ दिली. तालवाद्य मिलिंद दातार व विनय बाळ, संवादिनी वृंदा दातार, व्हायोलिन हरीश लांडगे, मायनर विलास देशकर निवेदन डॉ. अच्युत देशपांडे यांनी केले. निर्मिती विजया अभ्यंकर यांची होती व त्यांनी ती निवेदनासह सांभाळली.



## स्पर्धा इतरांशी नको, स्वतःशीच करा : शेखर गायकवाड

- **विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विद्यार्थी विकास केंद्राचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात काम करताना कधीही इतरांशी तुलना करू नका आणि कुणाशी स्पर्धा करू नका. स्पर्धा करायचीच असेल, तर ती स्वतःशीच करा. त्यातून तुमच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी साह्य मिळेल", असा सल्ला 'यशदा'चे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड यांनी दिला.

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विद्यार्थी विकास केंद्रातर्फे आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, विद्यार्थी विकास केंद्राचे अध्यक्ष प्रभाकर पाटील, विद्यार्थी विकास केंद्राच्या कार्यवाह सीमा होस्कोटे, आपटे वसतिगृहाच्या पर्यवेक्षिका सविता भुक्ते उपस्थित होते.

शेखर गायकवाड म्हणाले, "स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे, यश मिळवावे; पण स्पर्धेपलीकडे जाणे गरजेचे आहे. त्यासाठी एकत्र अभ्यास करायला शिका. त्यातून आपल्या कच्च्या विषयांची माहिती होते आणि सुधारण्यासाठी वाव मिळतो. तसेच इतर कुणाचे कुठले विषय कच्चे, पक्के आहेत, हे समजते. त्यातून कुणाला कुठली मदत, मार्गदर्शन हवे आहे, हेही कळते. सहकार्याची भावना वाढीस लागते. संतुलित आणि समतोल विचार महत्त्वाचा आहे. तो अंगिकारा. माहितीपेक्षा ज्ञान मिळवा. तुमच्यातील ऊर्जा, चैतन्य, कल्पकता आणि वेगळेपणाची समाजाला गरज आहे. ते सामर्थ्य प्राप्त करा."

सीमा होस्कोटे म्हणाल्या, "विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, स्वयंशिस्त निर्माण व्हावी, तसेच त्यांच्यातील ऊर्जेला , कल्पकतेला, कौशल्याला वाव मिळावा, यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते." पाहुण्यांचा परिचय विद्यार्थिनी स्नेहल कुलकर्णी हिने करून दिला. तुषार रंजनकर यांनी स्वागत केले. अनुष्का राऊत हिने आभार मानले. जीवन बोधले यांने सूत्रसंचालन केले.

## 'खडकवासला जलाशय रक्षण अभियाना'ची यशस्वी सांगता



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हिंदु जनजागृती समितीच्या वतीने धुलिवंदन आणि रंगपंचमी या दिवशी राबवण्यात येणाऱ्या 'खडकवासला जलाशय रक्षण अभियाना'ची 19 मार्चला यशस्वी सांगता झाली. प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही हे अभियान शतप्रतिशत यशस्वी झाले. 22 वर्षांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि प्रबोधनामुळे खडकवासला परिसरात धुलिवंदन आणि रंगपंचमी या सणांमध्ये शिरलेल्या अपप्रकारांमध्ये घट होऊन धर्मशास्त्राविषयी समस्त हिंदु जागृत झाल्याचे चित्र दिसून आले. याच्या परिणाम स्वरूप रंग खेळून पाण्यात उतरण्यासाठी येणाऱ्यांची संख्या नगण्य होती. भगवान श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन आणि आरती करून मोहिमेला 8 वाजता आरंभ झाला. या मोहिमेसाठी पुणे शहर,भोर आळंदे वाडी,पिंपरी चिंचवड,सासवड,हडपसर येथील धर्मप्रेमी नागरिक,हिंदुत्वनिष्ठ आणि समितीचे कार्यकर्ते असे 75 हून अधिक धर्मप्रेमी प्रत्यक्ष सहभागी झाले होते. या अभियानात महासंघाचे पुणे जिल्हा समन्वयक ह.भ.प. दत्तात्रय महाराज चोरघे आणि रणरागिणी शाखेच्या कु.क्रांती पेटकर हे मान्यवर उपस्थित होते. हिंदु जनजागृती समितीचे कार्यकर्ते पाण्याची हानी होऊ नये यासाठी दरवर्षी खडकवासला जलाशयाभोवती उभे राहतात. या मोहिमेमुळे जलाशयाचे प्रदूषण रोखले जात असल्याने आम्ही महाराष्ट्र मंदिर महासंघाचे कार्यकर्ते या अभियानात सहभागी झालो. महाराष्ट्रातील नद्या प्रदूषण मुक्त करण्यासाठी अशा प्रकारची अभियाने मोठ्या प्रमाणात राबवण्याची आवश्यकता आहे असे मत महाराष्ट्र मंदिर महासंघाचे पुणे जिल्हा समन्वयक हभप दत्तात्रय चोरघे महाराज यांनी व्यक्त केले. अश्या प्रकारे होत असलेले प्रबोधन त्यातून मिळणारा अभूतपूर्व सहभाग आणि संपूर्ण सकारात्मक प्रतिसाद यामुळेच या वर्षीही मोहीम 100% यशस्वी झाली.

मोहीम यशस्वी होण्यासाठी पाटबंधारे खाते, पोलीस प्रशासन, हितचिंतक यांनी मोलाचे सहकार्य केले. हिंदु जनजागृती समितीचे पराग गोखले यांनी सर्व सहभागी आणि सहकार्य करणाऱ्या नागरिकांचे समितीच्या वतीने आभार व्यक्त केले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.